# प्रेसनोट

जा.क्र. पोउप-आ/वाहतूक/ ९०३०/२०१८

पुणे शहर, दिनांक -०१/०९/२०१८.

**विषय :- दहीहंडी उत्सवानिमीत्त करण्यात येणा-या वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत.**

---

दिनांक ०३.०९.२०१८ रोजी दहीहंडी उत्सव पुणे शहरात ठिकठिकाणी मोठया उत्साहात साजरा केला जातो. विशेषतः शहरातील मध्यवर्ती भागातील शिवाजीरोड लक्ष्मीरोडवर सायंकाळी १७.०० वा. पासून दहीहंडी फुटे पर्यंत उत्सवाचे ठिकाणी भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. त्यावेळी सदर रस्त्यांवर कोठेही वाहतूकीची कोंडी होऊ नये व वाहनचालकांची गैरसोय होऊ नये, सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, तेजस्वी सातपुते,पोलीस उप आयुक्त,वाहतुक पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन **आवश्यकते** नुसार व तेथील वाहतुकीच्या परिस्थिनुसार वाहतुक व्यवस्थेमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येतील त्याबाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

१. शिवाजीरोडवरुन स्वारगेटच्या दिशेने जाणा-या पीएमपीएमएल बसेस व चारचाकी वाहनांनी शिवाजीनगर येथील स.गो.बर्वे चौकातून जंगली महाराज रोडने पुढे मार्गस्थ होतील व तीनचाकी व दुचाकी वाहने जिजामाता चौक व बुधवार चौक येथून पर्यायी मार्गाने जातील.

२. लक्ष्मी रोडने अलका टॉकीज चौकाकडे जाणा-या सर्व वाहनांनी सोन्या मारुती चौकातून पुढे फडके हौद चौक डावीकडे वळून जिजामाता चौक- बुधवार चौक-अप्पाबंळवंत चौक व केळकर रोडने पुढे मार्गस्थ होतील.

सदर भागातील वाहतूक परिस्थिती नुसार आवश्यकते प्रमाणे बदल करण्यात येणार आहेत. तरी वाहनचालकांनी सायंकाळी १७.०० ते दहीहंडी फुटे पर्यंत उपलब्ध पर्यायी मार्गांचा वापर करुन, वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.

## प्रेसनोट

जा.क्र. पोउप-आ/वाहतूक/१०३३/२०१८

पुणे शहर, दिनांक -०१/०९/२०१८.

**विषय :- वीर गोगादेव उत्सवानिमित्ताने पुणे कॅम्प भागात करण्यात येणा-या वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत.**

---

दिनांक ०३.०९.२०१८ रोजी वीर गोगादेव उत्सवानिमीत्त पुणे कॅम्प येथील न्यू मोदीखाना येथून मुख्य मिरवणूक सायंकाळी १६.०० वा.चे सुमारास निघणार आहे त्यामध्ये मोठ्या प्रमाणात नागरीक सामिल होत असतात सदर मिरवणूक दरम्यान वाहतूकीची कोंडी होऊ नये व वाहनचालकांची गैरसोय होऊ नये, सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, तेजस्वी सातपुते,पोलीस उप आयुक्त,वाहतुक पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन **आवश्यकते** नुसार व तेथील वाहतुकीच्या परिस्थितीनुसार वाहतुक व्यवस्थेमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येतील त्याबाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## वीर गोगादेव मुख्य मिरवणूक मार्ग

**मिरवणुक मार्ग :-** २२८९ न्यु मोदीखाना लष्कर येथून १६.०० वा. निघुन मोदीखाना रोडने पुलगेट पोलीस चौकी, मेढी माता मंदीर, महात्मा गांधी रोडने डावीकडे वळुन कुरेशी मशिद समोरुन सेंट्रल स्ट्रिट रोडने सरळ भोपळा चौक ते सेंट्रल स्ट्रिट चौकी, उजवीकडे वळुन महावीर चौक,उजवीकडे वळुन महात्मा गांधी रोडने कोहीनुर हॉटेल चौक ते पुल गेट पोलीस चौकी, मेढीमाता मंदीर येथे विसर्जन होणार आहे.तसेच खालीलप्रमाणे छोटया मिरवणूका या मुख्य मिरवणुकीत येऊन सामील होतात.

**मिरवणूक चालू झाल्यावर बंद करण्यात येणारे मार्ग व पर्यायी मार्ग -**

१. वाय जंक्शन वरुन महात्मा गांधी रोडकडे येणारी वाहतुक ही वाय जंक्शन येथे बंद करुन ती खाणे मारुती चौक येथे वळविण्यात येणार आहे. तसेच सोलापूर रोडला जाणारी वाहतुक ही खाणे मारुती चौक येथून उजवीकडे वळून जाईल व शहरात येणारी वाहतुक ही खाणे मारुती चौकातून सरळ ईस्ट स्ट्रिट रोडने इंदीरा गांधी चौकातून डावीकडे वळून महावीर चौक व तेथून पुढे एमजी रोडकडे जाईल किंवा इंदिरा गांधी चौकातून उजवीकडे वळून लष्कर पोलीस स्टेशन चौक व तेथून डावीकडे वळून तीन तोफा चौकातून इच्छित स्थळी जावे.

२. मुफ्ती फौज चौकातून कुरेशी मस्जिदकडे जाणारी वाहतुक ही बंद करुन सदरची वाहतुक ही चुडामन तालिमकडे वळविणेत येईल.

३. व्होल्गा चौकाकडून महमंद रफी चौकाकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदर वाहतुक सरळ ईस्ट स्ट्रिट रोडने इंदिरा गांधी चौकाकडे सोडण्यात येईल.

४. महावीर चौकातून सरबतवाला चौकाकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदरची वाहतुक एमजी रोडने नाझ चौकाकडे वळविण्यात येईल.

५. सरबतवाला चौकाकडून महावीर चौकाकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदरची वाहतूक ताबुत स्ट्रिट रोड मार्गे पुढे सोडण्यात येईल.

६. बाबाजान चौकाकडून भोपळे चौकाकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदर वाहतुक निशान टॉकीजकडे वळविण्यात येईल.

७. बाबाजान चौकाकडून कुरेशी मस्जिदकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदरची वाहतुक निशांत टॉकीजकडे वळविण्यात येईल.

८. शिवाजीमार्केट कडून सेंटर स्ट्रीट चौकीकडे जाणारी वाहतुक तसेच कोळसा गल्लीकडून एमजी रोडकडे जाणारी वाहतुक ही वाहतुक परिस्थितीनुसार बंद करण्यात येईल.

सदर मिरवणुक मार्गावर वाहतूक परिस्थिती नुसार आवश्यकते बदल करण्यात येणार आहेत. तरी वाहनचालकांनी दिनांक- ०३/०९/२०१८ रोजी सायं. १६.०० वा.पासून ते मिरवणूक संपेपर्यंत उपलब्ध पर्यायी मार्गांचा वापर करुन, वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.

**<u>प्रेसनोट</u>**

जा.क्र.पोउपआ/वाहतूक/पुणे शहर/ १०३५ /२०१८

पुणे, दिनांक- ०१/०९/२०१८

**<u>विषय</u> :- जास्तीत जास्त वाहतुकीचे नियमांचे उल्लंघन केलेल्या २०० वाहनचालकांचे माहीती बाबत.**

---

पुणे शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीत चालण्यासाठी वाहतूक शाखेकडून नियमित प्रयत्न करण्यात येत असून,वाहनचालकांकडून करण्यात येणा-या वाहतूक नियमभंगामुळेच अनेक लहान मोठे अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे. वाहनचालकांना शिस्त लागून अपघाताचे प्रमाण कमी व्हावे याकरीता वाहतूक शाखेतर्फे ई-चलन मशिनद्वारे व सीसीटीव्हीद्वारे वाहतूक नियमभंग करणा-या वाहन चालकांवर कारवाई करण्यात येते.

कारवाई करण्यात येणा-या वाहनचालकांना एसएमएस द्वारे माहिती दिलेली असते व त्यांनी तो दंड ऑनलाईन भरणे अपेक्षीत असते परंतु ब-याच वाहनचालकांचा दंड न भरण्याकडे कल आहे म्हणून वाहनचालकांना त्यांचेवर प्रलंबीत असलेल्या वाहतुक नियमभंगाच्या केसेस पाहण्यासाठी वाहतुक विभागाकडून punetrafficop.net ही वेब साईट उपलब्ध करुन देण्यात आली आहे. वाहनचालकांनी वेबसाईट ओपन केल्यानंतर आपला वाहन क्रमांक टाकल्यास आपल्या वाहनांवर प्रलंबीत असलेल्या केसेसची सविस्तर माहीती दिसते.त्यामध्ये PTPCHM म्हणजे ई चलन मशिनद्वारे कारवाई झाली आहे असे समजावे, सदर कारवाईमध्ये केलेल्या केसेसमध्ये वाहनचालकास त्यांचे फोटो पहायला मिळत नाही व ज्यांना कारवाई मान्य नाही ते न्यायालयात दाद मागू शकतात. तसेच PTPCHC म्हणजे सीसीटिव्ही मार्फत झालेली कारवाई आहे असे समजावे यामध्ये आपल्याला सीसीटीव्ही मार्फत काढलेले फोटो पुरावा म्हणून पहावयास मिळतील या सबंधात कोणाची काही तक्रार असल्यास पोलीस निरीक्षक,प्रशासन पोलीस उप आयुक्त,वाहतुक कार्यालय यांचेकडून अर्ज स्विकारून समाधान केले जाईल.

वाहतुक शाखेतर्फे सीसीटीव्हीचे माध्यमातून केलेल्या जास्तीत जास्त केसेस असलेल्या १०० वाहनांची यादी बनविली असून एका वाहनावर सर्वात जास्त ३२ केसेस असून सर्वात कमी १६ केसेस असल्याचे निदर्शनास आले आहे.तसेच ई-चलन डिव्हाईस मशिनद्वारे द्वारे केलेल्या केसेसमध्ये प्रलंबीत असलेल्या १०० वाहनांची यादी बनविली असून त्यामध्ये एका वाहनावर जास्तीत जास्त २० केसेस व कमीतकमी ८ केसेस असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची यादी punepolice.co.in वर प्रसारीत करण्यात आली आहे. तसेच ट्विटर/फेसबुक वरही प्रसिध्द केली जाणार आहे.

तरी सर्वांना विनंती आहे की punetrafficop.net वर जाऊन आपला गाडी नंबर टाकून प्रलंबित दंड भरावा.

- **जास्तीत जास्त केसेस असलेल्या २०० वाहनांची यादी punepolice.co.in वर पाण्याची पध्दत-**

www.punepolice.co.in
|
Home page
|
Information Centers
|
Traffic Branch
|

1) List of 100 Top Motor vehicle Act Offenders (offences registered By policeman on road)
2) List of 100 Top motor vehicle act Offenders (offences registered By CCTV)